Volume: 3 Issue: 8 Pages: 63-66




# कोरोनाच्या काळात, ज्ञानप्रकाशाची वरात, परदेशातील दारात

*1रविंद्र आनंद सपकाळे

*1 Assistant-Teacher. Dnyanprakash Vidyalaya, Mumbai, Maharashtra, India.

**Article Info.**
**E-ISSN: 2583-6528**
**Impact Factor (SJIF): 5.231**
**Peer Reviewed Journal**
**Available online:**
**www.alladvancejournal.com**

**Received:** 10/July/2024
**Accepted:** 08/Aug/2024

***Corresponding Author**
**रविंद्र आनंद सपकाळे**
Assistant-Teacher. Dnyanprakash Vidyalaya, Mumbai, Maharashtra, India.

**सारांश:**
कोरोनाच्या महामारीने संपूर्ण जगाचे आयुष्य बदलून टाकले. या काळ शाळा, विद्यालये, आणि इतर शैक्षणिक संघटना सर्वत्र बंद झाल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास थांबला, परंतु याच पार्श्वभूमीवर 'ज्ञानप्रकाश' या शैक्षणिक प्रकल्पाची जन्मशोध झाली. 'ज्ञानप्रकाशची वरात: परदेशातील दारात' या उपक्रमाने विद्यार्थ्यांना ज्ञानाचे द्वार उघडले.या प्रकल्पात विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक विषयांचे सत्र आयोजित केले गेले. या अंतर्गत वेबिनार, कार्यशाळा, वर्चुअल क्लासेस इत्यादींचा समावेश होता. विदेशी तज्ञ व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञानात वाढ करण्यासाठी मार्गदर्शन केले.'ज्ञानप्रकाश'चा मुख्य उद्देश हा होता की विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणात स्वतःच्या क्षमतेचा विकास करावा लागेल आणि समाजाच्या विकासात सहभागी होण्यासाठी तयारी करावी लागेल. या प्रकल्पात अनेक विषय घेण्यात आले, जसे की विज्ञान, गणित, इंग्रजी, आणि भारतीय संस्कृती त्याचप्रमाणे परदेशातील शिक्षण पद्धतींचा अभ्यास करण्याची संधी देखील विद्यार्थ्यांना मिळाली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानातील मर्यादा ओलांडण्यात यश प्राप्त केले. विविध संस्कृतींचा अभ्यास करण्यात आणि त्या संस्कृतिसह संवाद साधण्यात त्यांना मदत झाली. 'परदेशातील दारात ज्ञानप्रकाशची वरात' हा उपक्रम खूपच यशस्वी ठरला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर ज्ञान मिळवण्यास आणि विचारशक्तीला धारणा देण्यास मदत झाली.अशा प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांमुळे कोरोनाच्या काळातही ज्ञानाच्या प्रवासावर थांबण्याची गरज भासली नाही. ज्ञानाच्या प्रकाशात चालत राहण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळाली, जी भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. 'ज्ञानप्रकाशच्या वरात' ने दिलेल्या शिक्षणाने विद्यार्थ्यांना एक नवीन दिशा दिली आहे, ज्या माध्यमातून त्यांनी उत्कृष्टतेचा उत्सव साजरा केला आहे.

**मुख्य शब्द:** ऑनलाइन शिक्षण.शैक्षणिक उपक्रम.आंतरराष्ट्रीय शिक्षण.विद्यार्थी विकास.संस्कृतींचा आदानप्रदान.शैक्षणिक तंत्रज्ञान.डिजिटल शिक्षण.शालेय

**प्रस्तावना:**

**नवोपक्रमाची गरज आणि महत्व**

मानवी आयुष्याचा आणि पर्यावरणाचा सर्वात अविभाज्य घटक म्हणजे परिवर्तन.गेल्या दोन वर्षात पूर्ण आयुष्य बदलून गेले.सर्व क्षेत्रात बदल झाले तसेच शिक्षणात अनपेक्षित बदल झाले.ऑनलाइन शिक्षणाचा पाया रचला गेला आता पुढे काय असा प्रश्न उभा राहिला.ऑफलाइन सारखेच ऑनलाइन शिक्षण कसे रंजक करता येईल या दिशेने वाटचाल सुरू झाली.आम्हीलाही नवीन तंत्रज्ञान शिकता आले. तेव्हा कळत नकळत

Umbrella can't stop the rain
But can make us stand in rain
Confidence may not bring success
But gives us power to face any
Challenges in life.

मला हे आपले आवडते माननीय डॉ.अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी वाक्य आठवले आणि मग ठरवले परिस्थिति माणसाला खूप काही शिकवून जाते.नवीन प्रेरणेने सुरुवात केली आणि ठरवले की या वेळेचा आपण सदुपयोग करून घ्यावा.माझा विषय इंग्लिश आणि इतिहास या दोघांची सांगळ कशी होईल याचा प्रयत्न करू लागलो. सुरवातीला आम्ही Basic English वर भर दिला, मुलांना एकत्र केले काही बाहेरील शिक्षकासमोर English Activity घेतल्या, त्यानंतर सुदैवाने आम्हाला Meet My Class हा प्रोजेक्ट मिळला या उपक्रमाचा आशय होता "Country and Culture ": या अंतर्गत आम्ही

Brazil, Polond, Armenia, South America, Vietnam, Japan, Turkiye, Argentina,
Gauatemala, Czech Republic, Romania, Ukraine, Indonesia, Mexico, Russia

Colombia, Tunisia जवळ जवळ १७ देशांबरोबर उपक्रम घेतले व आम्हाला सांगायला आवडेल की या उपक्रमात आम्ही भारतीय व महाराष्ट्रच्या संस्कृतीची ओळख त्यांना करून दिली व तसेच त्यांच्या संस्कृतीची माहिती आम्हालाही मिळाली, या अगोदर आम्ही फक्त पुस्तकात त्यांची माहिती वाचत होतो पण या उपक्रमांतर्गत आम्ही प्रत्यक्ष त्यांना ऑनलाइन च्या माध्यमातून भेटलो, त्यांच्याशी बोललो.एक नावीन्यपूर्ण उपक्रम की आम्ही face to face त्यांच्याशी बोललो. या उपक्रमाचा फायदा असा की सर्व मुले ही इंग्लिश मधून त्यांच्याशी बोलत होती तसेच त्यांचे पालक सुद्धा या उपक्रमात सहभाग घेत होते. मुलांचा आत्मविश्वास वाढला होता आणि एक विश्वास निर्माण झाला होता की आम्ही परदेशातील मुलांबरोबर बोललो एक वेगळा आनंद आणि आत्मविश्वास मुलांमध्ये व माझ्यात निर्माण झाला. पालक वर्गाही खूप खुश आहे. कारण माझी शाळा ही मराठी माध्यमाची व सर्व मुले ही सामान्य घरातली पण खूप मेहनती. आमचा उद्देश मुलांच्या मनातील भीती दूर करून परदेशी संस्कृतीची ओळख त्यांना परदेशातील मुलांकडून करून देणे. आजही आमचा हा उपक्रम सुरू आहे आम्हाला अजून खूप देशांशी बोलायचे आहे त्यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे.

## नवोपक्रमाची उद्दिष्ट्ये

1. मुलांना बोलते करणे.
2. मुलांमधील इंग्लिश विषयाची भीती दूर करणे.
3. मुलांना भारतीय व परदेशी संस्कृतीची ओळख करून देणे.
4. मुले ही परदेशातील मुलांसोबत बोलू शकतात असा आत्मविश्वास निर्माण करणे.
5. Online च्या माध्यमातून परदेशातील विद्यार्थी व शिक्षक यांच्यासोबत सवांद साधणे.
6. Local to Global यावर जास्त भर देणे.
7. महाराष्ट्रची व भारतीय संस्कृतीची माहिती परदेशातील विद्यार्थ्यांना देणे.
8. परकीय संस्कृतीची माहिती घेणे.
9. मुलांमध्ये विषयाची गोडी निर्माण करणे.
10. मुलांना विविध आंतरराष्ट्रीय उपक्रमात सहभाग घेण्यास प्रवृत्त करणे.
11. मुलांना नवीन शैक्षणिक तंत्रज्ञांनाची ओळख करून देणे.
12. इतिहास व इंग्लिश विषयाची सांगळ घालून तंत्रज्ञानाची मदत घेऊन उपक्रम रंजक कसा करता येईल यावर भर देणे.

## नवोपक्रमाचे नियोजन

"इंसान सफल तब होता है, जब वो दुनिया को नही
बल्की खुद को बदलना शुरू कर देता है"

आपल्या सर्वांचे आवडते माननिय डॉ.अब्दुल कलाम यांचे हे प्रेरणादायी वाक्य आठवले आणि बरोबर आहेच कारण आपण बघतो आहे की शिक्षणा मध्ये खूप मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. शिकणे व शिकवण्याची माध्यमे बदलेले आहे.तेव्हा आपल्याला बदलायला पाहिजे व या वेळेचा काहीतरी उपयोग केला पाहिजे तेव्हा सुदैवाने MEET MY CLASS या उपक्रमा अंतर्गत आम्ही जवळ जवळ १७ परदेशातील विद्यार्थी व शिक्षक यांच्या सोबत 'Country and Culture' हा उपक्रम घेण्याचे ठरवले.

a) सर्वात प्रथम मुलांना ऑनलाइनच्या माध्यमातून बेसिक इंग्लिश या उपक्रमावर जोर दिला.
b) मुलांची उजळणी घेतली त्यांना सोपे विषय इंग्लिश मधून बोलण्यासाठी दिले.
c) त्यांनातर त्यांना भारताची व महाराष्ट्रची संस्कृती याबद्दल माहिती जमवण्यास सांगितली
d) माहिती सोप्या इंग्लिश भाषेत बोलण्यास प्रवृत्त केले
e) Google च्या माध्यमातून माहिती व चित्रे मिळवली
f) मुलांना google slide कश्या बनवाव्यात याचे मार्गदर्शन केले.
g) मी व मुलांनी एकत्र भारतीय व महाराष्ट्राच्या संस्कृति विषयी Google Slide तयार केल्या
h) पहिल्यांदा आम्ही एकमेकांशी google slide च्या माध्यमातून सादरीकरण करू लागलो
i) मुलांना आपल्या देशाविषयी इंग्लिश मधून सादरीकरण करण्यात आनंद वाटू लागला, त्यांचा

**तालिका 1:** वेळापत्रक

| अ. क्र. | कार्यवाहीचा तपशील | कालावधी / महिना |
|---|---|---|
| 1. | मुलांची basic English उजळणी | माहे-जानेवारी (२०२१) |
| 2. | मुलांनी त्यांच्या गावाविषयी, आवडत्या व्यक्तीबद्दल, किवा कोणत्याही विषयाबद्दल सोप्या इंग्लिश भाषेतून सादरीकरण करणे | माहे-फेब्रुवारी |
| 3. | मुलांना google slide बनवायला शिकवणे, तसेच google slide च्या मदतीने सादरीकरण करणे. google च्या मदतीने भारतीय आणि महाराष्ट्रची संस्कृती विषयी माहिती मिळवणे | माहे-मार्च |
| 4. | पालक आणि शिक्षक त्याच बरोबर बाहेरील मान्यवर शिक्षक यांच्या समोर google slide च्या मदतीने विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीची माहिती आत्मविश्वासाने सादर करणे | माहे-एप्रिल |

## आत्मविश्वास वाढला

j) Lockdown मध्ये काही शिक्षकांशी ओळखी झाल्या तेव्हा आमच्या या उपक्रमात आम्ही डी. आर. हायस्कूल, नंदुरबार येथील श्री चन्द्रशेखर पाटील सर यांना, तसेच एसटीआय माझगाव श्री शैलेश खरात सर यांना ऑनलाइन आमंत्रित केले त्यांच्या समोर मुलांनी आपल्या देशाच्या संस्कृतीचे इंग्लिश मधून google slide च्या मदतीने सादरीकरण केले. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाने आणि कौतुकाने मुलांचा आत्मविश्वास वाढला.
k) त्यांनतर आम्ही MEET MY CLASS अंतर्गत परदेशातील शिक्षक व विद्यार्थी यांच्याबरोबर एकमेकांच्या देशविषयी व संस्कृतीविषयी माहितीची आदानप्रदान करण्यास सुरवात केली.
l) नवोपक्रमसाठी लागणारा कालावधी निच्छित करून नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाहीचे वेळापत्रक खालील प्रमाणे

**नवोपक्रम कार्यवाहीचे वेळापत्रक खालील प्रमाणे**

**तालिका 2:** वेळापत्रक

| Sr. No | Date | Country | Teacher's Name |
|---|---|---|---|
| 1 | 12th April 2021 | Brazil | Mrs.Bruna Britto |
| 2 | 14th April 2021 | Poland | Mrs.Dorota Nowak |
| 3 | 30th April 2021 | Armenia | Miss Ani Migayelyan |
| 4 | 2nd May 2021 | Ecuador (South America) | Mr.Luis Alfredo |
| 5 | 7th May 2021 | Mexico | Mrs.Vianney Funghi |
| 6 | 12th May 2021 | Turkiye | Mr.Daniel Aide Okun |
| 7 | 24th May 2021 | Argentina | Mrs.Carina Chartier |
| 8 | 29th May 2021 | Gauatemala (America) | Mrs.Nadya A Rivera |
| 9 | 3rd June 2021 | Czech Republic | Mrs.Lucie Sirmerova |
| 10 | 8th June 2021 | Ukraine | Mrs.Natalia Orishych |
| 11 | 14th June 2021 | Japan | Mrs.Noriko Matsubara |
| 12 | 20th June 2021 | Vietnam | Mrs.Mai Linh |
| 13 | 22nd June 2021 | Indonesia | Mrs.Laily Cahyani |
| 14 | 26th June 2021 | Romania | Mrs.Vali Ciocirlan |
| 15 | 2nd July 2021 | Tunisia | Mrs.Naimassimo Knanicht |
| 16 | 4th July 2021 | Colombia | Mrs.Fraynori Gomez Medina |
| 17 | 8th July 2021 | Russia | Mrs.Ekatarina Soloveva |

**नवोपक्रमाची यशस्वीता**

मला सांगायला आवडेल की माझा हा उपक्रम मुलांच्या सक्रिय सहभाग आणि त्यांची जिद्द यामुळे यशस्वी झाला. या उपक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांबरोबर मला व माझ्या सहकारी शिक्षक आमच्या मुख्याध्यापिका तसेच पालक वर्ग यांनाही झाला असे म्हणणे वावगे ठरणार नाही. पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

a) मुलांचा आत्मविश्वास वाढला
b) मुले बोलकी झाली
c) त्यांना तंत्रज्ञानाची ओळख झाली
d) त्यांचे मुद्दे स्वतः मांडू लागली
e) प्रत्यक्ष कृतीतून शिकण्यामुळे मुलांना आनंद वाटू लागला
f) मुलांच्या मनातून आपण परदेशातील मुलांबरोबर बोलू शकत नाही हा गैरसमज दूर झाला
g) मुलांना आपल्या संस्कृती विषयी माहिती सांगताना खूप गर्व वाटू लागला
h) मुलांनी आपल्या बोलीभाषेतील काही काव्य, वेशभूषा तसेच काही पदार्थ याचे खरेखुरे प्रात्यक्षिक त्यांच्यासमोर सादर केले
i) परकीय संस्कृतीची अगदी जवळून त्यांना माहिती मिळाली
j) कुठल्याही प्रकारची भीती न बाळगता मुले त्याना प्रश्न विचारू लागली तसेच त्यांच्या प्रश्नाची उत्तरेही देऊ लागली
k) एक वेगळ्या प्रकारचा आनंद आणि आत्मविश्वास मुलांच्या चेहऱ्यावर झळकत होता
l) मुले स्वतहून सादरीकरण करू लागली
m) परदेशातील शिक्षकांकडून कौतुक मिळताना त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता
n) आपल्या संस्कृती तसेच परदेशातील संस्कृति यातील फरक ओळखू लागली व प्रत्येक संस्कृती ही प्रत्येकासाठी श्रेष्ठ आहे याची त्यांना अगदी जवळून जाणीव झाली
o) पुस्तकात आपण या देशाबद्दल वाचत होतो पण आता प्रत्यक्ष आपण त्यांना live बघत आहोत, त्यांच्याशी बोलत आहोत हे कुतूहल मुलांमध्ये दिसले.
p) मुलांना आणखी इतर देशाशी बोलून त्यांची संस्कृतीची माहिती घ्यायची आहे अशी जिज्ञासा निर्माण झाली

**समारोप-"प्रयत्न आणि सातत्य ह्या दोन गोष्टी जवळ असल्या तर आयुष्यात अशक्य काही नाही"**

वरील वाक्य श्री व. पू. काळे यांचे हे प्रेरणादायी वाक्य खूप काही शिकवून जाते. गेल्या दोन वर्षात आपण पहिले शिक्षण पद्धतीमध्ये आमुलाग्र बदल झाले.ऑफलाइन ची जागा ऑनलाइन ने घेतली. मनात प्रश्न होता की या वेळेचा उपयोग काहीतरी नवीन उपक्रम करण्यासाठी करावा. माझी शाळा ही मराठी मध्यमाची आणि मुले ही गरीब घरातली ही वास्तविकता आहे गैरसमज नको. सुदैवाने आम्हाला Meet My Class हा प्रकल्प मिळाला आणि या अंतर्गत आम्हाला जगातील १७ देशाबाबोबर Country and Culture हा उपक्रम घेतला मुलांनी खूप मेहनत घेतली. तंत्रज्ञानापासून ते सादरीकरण मुलांनी केले. आमच्या दोघांचेही कष्ट आणि जिद्द व परिश्रम यामुळे या उपक्रमाला एक नवी दिशा व ओळख मिळाली. त्याच बरोबर मला सांगायला आवडेल की पालकांनी उत्तम साथ दिली. वेळ असेल तेव्हा ते मुलांबरोबर सहभाग घेत होते. आणि सर्वात म्हणजे मुलांच्या मनातील इंग्लिश बोलण्याची भीती दूर झाली आणि त्यांना परदेशातील भाषा, संस्कृतीची ओळख परदेशातील मुलांकडून मिळाली.अशीच प्रेरणा आम्हाला मिळत राहो आणि ज्ञानदानाचे चांगले काम आमच्या मार्फत घडो व अशीच सर्वांची यशस्वी वाटचाल तुमच्या सर्वांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाने घडो ही ईश्वर चरणी प्रार्थना करतो.

**संदर्भ:**


1. You tube links.
2. शिक्षक ध्येय मासिक
3. Google
4. शाळेचे अध्यक्ष मननीय श्री दत्तात्रय सावंत साहेब, मुख्याध्यापिका श्रीमती नीलिमा टेकाडे मॅडम आणि पर्यवेक्षिका श्रीम.मृणाली गोरुले मॅडम आणि माझे सहकारी यांची मदत
5. माझे गुरु श्री हरिश्चंद्र भट आणि परम मित्र श्री रॉबिन जॉर्ज यांचे अमूल्य मार्गदर्शन आणि सहकार्य.
6. सर्वात अगदी मनापासून माझे विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांचा विश्वास आणि लाख मोलाचे सहकार्य.

7. काहीतरी नवीन करण्याची आशा.
8. https://youtu.be/zeIIxz78Tyw
9. https://www.youtube.com/channel/UCDML7DcNtLZydGcVL75-PuA/videos
10. https://youtu.be/b2jrtrBuJ4g
11. Polond